OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

# मराठवाड्यातील नामांतर आंदोलन : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. सुनीता आत्माराम टेंगसे**
**सहयोगी प्राध्यापक**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय
सोनपेठ ता. सोनपेठ
जी. परभणी.

**गांगर्डे गोपाळ मदन**
सहाय्यक प्राध्यापक,
विवेकानंद, स.द. वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, औरंगाबाद
E-mail. :
bgopalgangarde@gmail.com

**प्रस्तावना :**

विविधता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्ये आहे. जात, पंथ, धर्म, संप्रदाय, भाषा इ. बाबतीत वेगळेपणा आपल्या देशात दिसून येतो. धर्मांधता, जातीय पुवग्रह व भाषीक वैर या फुटीरतेच्या शक्ती राष्ट्रीय एकात्मतेवर आघात करतातच, पण त्याचबरोबर जाणीवपूर्वक जोपासलेली उदाशिनता, भष्ट्राचारांचा सर्वंकष संचार व राष्ट्रीय जीवनाच्या विविध पातळीवरील नेतृत्वामध्ये निष्ठांचा अभाव यामुळे देशाच्या एकात्मतेवर आघात होत आहेत.

म्हणून समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून सामाजिक चळवळी म्हणजे काय? त्या का निर्माण होतात? त्याचे नेतृत्व कुणाकडे असते? चळवळीमागील प्रेरकशक्ती कोणती? ऐन जोशात आलेल्या चहवळी एकाकी कोलमडून का पडतात? अशा अनेक प्रश्नाची उत्तरे शोधने आवश्यक आहे.

आज आपल्या देशात जातीय दंगली, स्त्रियांवर वाढते अत्याचार, नक्षलवादी हाहाकार, दलितावरील अत्याचार, आदिवाशीवरील कारवाया, तामिळी राष्ट्रवाद, एन.आर.सी., रोहिया मुसलमान यासारख्यासमस्याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे. यातून मार्ग काढण्यासाझी चळवळी उभ्या राहतात आणि समाज एकसंघ ठेवण्याचा प्रयत्न करत असतात.

सामाजिक चळवळीचा संबंध हा प्रामुख्याने सामाजिक परिर्वनाशी असतो. सामाजिक चळवळीमुळे सामाजिक व्यवस्था बदलण्याचा संभव असते. कारण चळवळी या व्यवस्था बदलण्याच्या उद्देशानेच बांधल्या जातात. या माध्यमांतून समाजाच्या प्रश्नांचा वाचा फोडण्यासाठी सामुदायिक कृतीद्वारे संप, मोर्चे, घोषणा, सभा, मिरवणूक अशा कृती होवू लागतात. तेव्हाच चळवळीचे हव्यरूप समोर येते.



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**पध्दतीशास्त्र :**

वरील संशोधनाचा अभ्यास हा माहिती संकलनाआधारे केला गेला आहे. त्यात नामांतरावरील वृत्तमानपत्रातील लेख, पुस्तके यांचा आधार घेतला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये :**

1. नामांतर चळवळीतून निर्माण झालेली जातीय पोकळी कमी करणे.
2. नामांतर चळवळीचा अभ्यास करून नवीन पिढीस सत्य माहिती करून देणे.
3. नामांतर चळवळीनंतरची परिस्थिती अभ्यासणे.

**नामांतर आंदोलन :**

14 जानेवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नामांतर दिवस पण या नामांतराच्या दिवसाची वाट पाहण्यासाठी आंबेडकरवादी जनतेला 17 वर्ष संघर्ष करावा लागला. शिक्षण हे मागासवर्गीय समाजासाठी अन्य कोणत्याही भौतिक लाभांपेक्षाही सर्वाधिक महत्वाचा लाभ आहे. दबलेल्या नि पिचलेल्या मागासवर्गीय समाजाने शिक्षण घेतले तरच त्यांचा उत्कर्ष आहे व तेही सर्वाच्च शिक्षण, उच्च शिक्षण घेतले तरच ते प्रगतीपथावर जाऊ शकतात. अन्यथा त्यांचे जीवन असुरक्षित नि कष्टप्रदच राहील. उच्चशिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. उच्चशिक्षण हे बुध्दीजीवी वर्गाचे क्षेत्र असले तरी या क्षेत्रात गरीब व दुर्बल घटकाच्या माणसास संधी मिळायला हवी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते. हजारो वर्षापासून शिक्षणापासून वाचत असलेल्या आणि निजामाच्या राजवटीत जे मागासलेपणाच्या यातना भोगत होते त्यांना शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी 1950 ला औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी श्री. गोविंदभाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ बाबासाहेबांच्या भेटीला आले होते. बाबासाहेबांशी बोलताना त्या शिष्टमंडळाने "आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहात ते या ठिकाणी चालेल का ?" असा प्रश्न केला. त्यावेळी बाबासाहेब उद्दारले येथे फक्त एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर येथे एक विद्यापीठही उभारले जावे अशी माझी तीव्र इच्छा आहे आणि बाबासाहेबांच्या प्रयत्नाचे फलित म्हणून 1958 साली मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाला नाव काय द्यावे हा प्रश्न समोर आला. तेव्हा महाराष्ट्र सरकारने नाव निश्चित करण्यासाठी एक समिती गठीत केली. शासननियुक्त समितीने विचारार्थ घेतलेल्या व गार्भिर्याने चर्चा केलेल्या नावांमध्ये मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन, सातवाहन, अशी सर्व स्थळ व भूमी-राज्यवाचक नावे होती. फक्त दोनच व्यक्तींची नावे सुचविली होती.

छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे. यातील शिवाजी महाराजांच्या नावाने आधीच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पूर्व 1960 साली स्थापन झाले. त्याचे उचित विद्यापीठीय स्मारक आहे पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव देण्याचे राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने ठराव 27 जुलै इ.स. 1978 ला संमत करण्यात आला. महाराष्ट्रातील आंबेडकरवादी जनतेसह सर्वांनाच आनंद झाला. परंतु त्याने मनुवादी लोकांचे पोट खवळले. त्यांनी विद्यापीठाच्या नामांतराला कडाडून विरोध केला. या विरोधाला आंबेडकरी जनता मुळीच डगमगली नाही. नामांतराची लढाई पुढे जोमाने चालूच ठेवली. विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळावे म्हणून अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या बलिदानाची पर्वा केली नाही. आंबेडकरी जनता आपल्या बाबासाहेबांच्या नावासाठी वटक न करण्यास तयार होती. नामांतराची लढाई ही दीन दलितांच्या अस्मितेची लढाई होती. ही चळवळ म्हणजे महाराष्ट्रातील आणि देशातील सर्वात मोठी लढाई होती. या लढ्यात कित्येक कार्यकर्ते शहीद झाले. कितीतरी युवक-युवतींना आपले प्राण गमवावे लागले. कित्येकांच्या घरादाराची राखरांगोळी झाली. कित्येक दलित आया-बहिणींवर बलात्कार झाले तर काही गावात दलित समाजावर बहिष्कार टाकण्यात आला. सार्वजनिक पाणवठ्यावर दलितांना बंदी करण्यात आली. दलित आया-बहिणींच्या कित्येक गावातून भरचौकातून उघड्या-नागड्या धिंडी काढण्यात आल्या. नामांतराच्या या काळामध्ये जातीयवादी नराधमांनी अत्याचाराची सीमा ओलांडली होती. पोलीसांनीही लहान बालके, स्त्री, वृद्ध, पुरुषांवर बेसुमार लाठीचार्ज केले तर काही वेळा बंदुकीचाही वापर केला. विद्यापीठ म्हणजे काय हेही ज्यांना धडपणे माहित नव्हते त्या दीनदुबळ्या दलितांवर खेडोपाडी अमानुष अत्याचार करण्यात आले. आईच लेकरू आईविना पोरके झाल्यासारखी दलित बांधवांची अवस्था झाली होती. एवढे होत असतानाही धाडसी भीमसैनिकांनी कधीच माघार घेतली नाही. फक्त बाबासाहेबांच्या नावासाठी दलित बांधवांनी अनेक अन्याय-अत्याचार मुकाट सहन केले. गावोगावी, शहरात आणि खेड्यापाड्यातील नामांतराच्या आंदोलनाची ठिणगी पडलेली होती. जिकडे-तिकडे एकाच नारा गुंजत होता. **"नामांतर झालेच पाहिजे"** नांदेडमध्ये दलित पँथरच्या गौतम वाघमारे या कार्यकर्त्याने सरकार नामांतर करत नाही म्हणून स्वतःला भरचौकात जाळून घेतले. अखेरच्या श्वासापर्यंत एकच नारा "नामांतर झालेच पाहिजे" बाबासाहेबांच्या नावाखाली त्याने आपल्या प्राणाचे बलिदान केले. परभणी जिल्ह्यातही पोचिराम कांबळे यांचे हात-पाय तोडण्यात आले. त्यांनाही जातीयवादी सैतानांनी जर्जर करून ठार मारले. जनार्दन मवाडे, संगीता बनसोडे, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदन कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे कितीतरी दलित क्रांतीवीर नामांतराच्या लढ्यात शहीद झाले. जातीयवादी सरकार नामांतर करत नाही म्हणून दलित मुक्ती सेनेचे सरसेनापती आणि लॉंगमार्च प्रणेते प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दलित बहुजन समाजाची फौज जमा करून नागपूर ते औरंगाबाद

असा लॉंगमार्च आयोजित करून "जिंकू किंवा मरू", जळतील नाहीतर जाळून टाकतील" अशी आक्रमक भूमिका घेतली. लॉंगमार्च मधील निष्पाप लोकांवर इंग्रजानाही लाजवेल अशा क्रूरपणे लाठीहल्ले केले. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या, किल्येकांना तुरूंगात डांबले. या निष्पाप दलितांचा गुन्हा काय? तर आपल्या पित्याचे (बाबासाहेबांचे) नाव विद्यापीठाला द्यावे हि (सरकारी) मागणी. ज्यांनी दीनदलित, पिचलेल्या आणि उच्चभ्रू समाजाने वाळीत टाकलेल्या समाजातील माणसाला माणूसपण मिळवून दिले, जगण्याचा हक्क दिला, त्या उत्तरदायीत्वापोटी बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला द्यावे ही रास्ता व न्यायपूर्ण मागणी गुन्हा ठरवून अमानुष्य वागणूक देणाऱ्यांचा निषेध केला पाहिजे. या लॉंगमार्चमध्ये मामा सरदार कवि इ.मो. नारनवरे, सुरेश घाटे, बबन बोदांटे, जगदीश थुल, थॉमस कांबळे, जे.के. नारायणे, गोपाळराव आटोटे, नामदेवराव खोब्रागडे, दिलीप पाटील, नरेश वहाणे, भीवा बडगे, सरोज मेश्राम यांच्यासारखे लढाऊ कार्यकर्त लढण्यासाठी सज्ज झाले होते. याशिवाय दक्षिण नागपूर येथे सुखदेव रामटेके यांच्या नेतृत्वातही एक लढा लढला होता. पोलिसांनी दलितांच्या जोगीनगर, भीमनगरात अश्रूधूर फेकले असताना ते कॅच पकडून पुन्हा पोलिसांकडे भिरकाणारे कार्यकर्त आजही या नामांतर आंदोलनाचा इतिहास डोळ्यात साठवून ठेवला आहे.

नागपूरात चोहिकडे आंदोलने पेटले होते, पश्चिमचे आंदोलन ॲड विलमसूर्य चिमणकर, उत्तरचे आंदोलन प्रा. रणजित मेश्राम, उपेंद्र शेंडे यांच्यापासून तर राजन वाघमारे यांच्यापर्यंत लढला गेला. माजी आमदार शेंडेचे उपोषण लॉंगमार्चनंतरचा एक महत्त्वाचा टप्पा. दक्षिणेत भूपेश थुलकर, दादाकांत धनविजय, अमर रामटेके, सुधाकर सोमकुवर, मधु दुधे, विलास पाटील, बाळु हिरोळे, सुनील लामसोंगे अशी असंख्य नावं घेता येतील. वर्धापन दिनाच्या पर्वावर नामांतराचा वणवा कार्यकर्त्यांच्या जणू बुबुळात पेरला असल्याचे दिसत आहे. आंदोलनाचे चित्र कार्यकर्त्यांनी वर्धापन दिनाच्या पुर्वसंध्येला चर्चेतून उभे केले. मराठवाड्यात शिक्षणाची गंगा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणली, औरंगाबाद शहरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून, शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या मराठवाड्याला प्रगत करण्याचं काम महामानवाने केले तत्कालीन मुख्यमंत्रयाला समजले की बाबासाहेबांची ही लेकरे बाबासाहेबासाठी प्राण घ्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. जर यांच्या संयमाचा अंत झाला तर हेच लोक दुसरांचा प्राण घ्यायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एकच आवाज होता नामांतर-नामांतर... चारही बाजूने सरकारच्या नाड्या आवळल्या जात होत्या. त्यांच्यासमोर नामांतराशिवाय पर्याय उरला नाही. 17 वर्षाच्या कडव्या संघर्षानंतरत शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली व 14 जानेवारी इ.स. 1994 रोजी मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद' असा नामविस्तार करण्यात आला. ज्या महामानवाने देशाची राज्यघटना

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

लिहिली, मराठवाड्यात उच्च शिक्षणासाठी विद्यापीठा असावे हि सर्वप्रथम कल्पना मांडली त्या महापुरूषाचे नाव विद्यापीठाला देण्यासाठी 17 वर्ष संघर्ष करावा लागला. नामांतर झाले परंतु अर्धवट नामांतर झाले, हि खंत आजही भिमसैनिकांच्या मनात आहे. विद्यापीठाचे पहिले नाव 'मराठवाडा विद्यापीठा औरंगाबाद' असे होते. नामांतरानंतर "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" एवढेच झाले.

**निष्कर्ष :**

1. नामांतर आंदोलनामुळे दलित समाजाचा स्वाभिमान जागृत झाला.
2. नामांतर आंदोलनामुळे समाजातील लोकांना आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी संघर्ष उभा करणे शक्य झाले.
3. नामांतर आंदोलनामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार सर्व समाजघटकापर्यंत पोहचले.
4. समाजातील सामाजिक विषमता वा उच्च-निच्च परंपरा काही प्रमाणात कमी झाले.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. दैनिक लोकमत : 14 जाने 2014.
2. दैनिक दिव्यमराठी 14 जाने. 2020
3. रविंद्रनाथ मुखर्जी - सामाजिक विचारधारा, विवेक प्रकाशन, दिल्ली.
4. नामांतर आंदोलन - डॉ. राजेंद्र शिंदे - निर्मळ प्रशासन
5. सामाजिक चळवळीचे समाजशासन - डॉ. बी.एम. कऱ्हाडे. पिंपळापुरे प्रकाशन नागपूर
6. विकीपिडीया -
7. डॉ. सुधा काळदाते - सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी बी. रघूनाथ प्रकाशन - परभणी
8. डॉ. नारायण चौधरी - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातील विद्यापीठ सामाजिक चळवळी एप्रिल 2004
9. घनश्याम शहा - सामाजिक चळवळी आणि सरकार डायमंड पब्लिकेशन पुणे
10. श्रीकांत सांळुखे - महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ बी.रघूनाथ प्रकाशन - परभणी - 1996
11. शंकरराव खरात - सामाजिक चळवळीचा इतिहास- इद्रायणी साहित्य पुणे
12. डॉ. एस.जी. देवगांवकर - साईनाथ प्रकाशन, जयपूर - 2009

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani